ठाणे, शनिवार दि. २७ जुलै २०२४ | वर्ष : १३, अंक : ८९ पाने : ८, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

दैनिक
# महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**डोंबिवलीत मानवनिर्मित महापूराचे संकट**

डोंबिवली पश्चिमेत देवीचापाडा, कुंभारखाणपाडा, गणेशनगर भागात असणाऱ्या झोपडयांना महापुराचा विळखा बसला आहे. याचे कारण म्हणजे हे निसर्गनिर्मित संकट नसून मानवनिर्मित संकट आहे. .......पान ४ वर



पुरात वाहून जाणाऱ्या तरुणाला गावकऱ्यांनी वाचवलं ...पान ४ वर

# शेतकऱ्यांना 5 वर्षे मोफत वीज मिळणार

## सरकारनं काढला जीआर

**शेतकऱ्यांसाठी मोठी आणि महत्वाची बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेनुसार जे शेतकरी ७.५ एचपी म्हणजे अश्वशक्तीपर्यंत कृषी पंप वापरतात त्या शेतकऱ्यांना मोफत वीज मिळणार आहे. पुढील पाच वर्ष मोफत वीज देण्यासंदर्भातील जीआर शासनाने काढला आहे. एप्रिल २०२४ ते मार्च २०२९ दरम्यान ही योजना लागू करण्यात येणार आहे. ४४ लाख ०३ हजार शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होणार आहे.**



### तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर सरकार घेणार योजनेचा आढावा

सरकारनं अर्थसंकल्पात शेतकऱ्यांचे वीज बील माफ करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार आता जीआर काढण्यात आला आहे. या योजनेचा राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. दरम्यान, या योजनेला तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिचा आढावा घेऊन पुढील कालावधीत योजना राबवण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असं जीआरमध्ये सांगण्यात आलं आहे. शेतकऱ्यांना कृषी पंपाची वीज मोफत देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री व वित्त मंत्री अजित पवार यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात अर्थसंकल्प सादर करताना जाहीर केला होता.

**पण तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर सरकार घेणार निर्णय...**

### ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेचे कृषीपंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांना लाभ मिळणार नाही

दरम्यान, जे शेतकरी ७.५ एचपीपर्यंत कृषी पंप वापरतात त्यांना मोफत वीज मिळणार आहे. म्हणजेच ७.५ एचपीपेक्षा कमी क्षमतेचे कृषी पंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांनाही मोफत वीज मिळणार आहे. केवळ ७.५ एचपी पंपासाठी हा निर्णय नाही. पण ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षेमतेचे कृषी पंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांना वीज बील भरावे लागेल. म्हणजेच काय ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेचे कृषी पंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांना या योनजेचा लाभ मिळणार नाही.

### वीज बिलापोटीचे १४७६० कोटी रुपये सरकार महावितरणला देणार

कृषी पंपांच्या बिलाच्या वसुलीची चिंता महावितरणला नेहमीच असते. मात्र, आता या वीज बिलापोटीचे १४७६० कोटी रुपये सरकार महावितरणला देणार असल्याने त्यांची चिंता मिटणार आहे. कृषी पंप वीज बिलाची एकूण थकबाकी ५० हजार कोटी रुपये आहे. या वीज बिल माफीसाठी येणारा खर्च राज्य सरकार उचलेल. त्या पोटी राज्य सरकार महावितरणला १४ हजार ७६० कोटी रुपयांचे अनुदान दरवर्षी देणार आहे. राज्यात मार्च २०२४ अखेर ४७.४१ लाख कृषीपंप ग्राहक शेतकरी आहेत. एकूण वीज ग्राहकांच्या तुलनेत हे प्रमाण १६ टक्के आहे. ३० टक्के वीज कृषी पंपांसाठी वापरली जाते. कृषी ग्राहकांचा सध्याचा एकूण वार्षिक वीज वापर ३९ हजार २४६ दशलक्ष युनिट आहे. राज्यात कृषी पंपांना रात्री ८/१० तास किंवा दिवसा ८ तास वीजपुरवठा केला जातो.

# ठाकरे गटाच्या आमदारांना लवकरात लवकर अपात्र करा

**६ ऑगस्टला सुनावणी**



**शिंदे गटाची पुन्हा हायकोर्टात याचिका**

**मुंबई : आमदारांच्या अपात्रतेबाबत शिंदे गटाचा पुन्हा हायकोर्टात धाव घेतली आहे. शिंदे गटाने हायकोर्टाला तातडीच्या सुनावणीसाठी विनंती केली आहे. उध्दव ठाकरे गटाच्या आमदारांना अपात्र करण्यासाठी भरत गोगावलेंनी याचिका केली आहे. आमदार अपात्र न करण्याच्या विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निर्णयाला आव्हान दिले आहे. न्यायालयाने त्यावर ६ ऑगस्ट रोजी सुनावणी ठेवली.**

शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर शिंदे आणि ठाकरे गटाकडून एकमेकांच्या आमदारांना अपात्र ठरवण्यासाठी याचिका दाखल करण्यात आल्या. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सप्टेंबर ते डिसेंबर २०२३ या कालावधीत शिवसेना आमदार अपात्रतेवर सुनावणी पूर्ण झाली. त्याचा निकाल राहुल नार्वेकर यांनी १० जानेवारी रोजी जाहीर केला. राहुल नार्वेकर यांनी एकनाथ शिंदे आणि त्यांच्या आमदारांना दिलासा देतानाच, ठाकरे गटाच्या आमदारांना अपात्र ठरवले नाही. ठाकरे गटाच्या आमदारांना अपात्र न ठरवल्यामुळे आता भरत गोगावलेंनी आता मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. आमदारांचा कार्यकाल संपण्याआधी सुनावणी घेण्याची विनंती गोगावलेंनी याचिकेत केली आहे. मात्र शिवसेना उध्दव ठाकरे गटाकडून तातडीच्या सुनावणीवर आक्षेप आहे.

### काय म्हटले आहे याचिकेत?

विधानसभा अध्यक्षांचा निर्णय मनमानी, बेकायदा आणि असंविधानिक आहे. रेकॉर्डवर सादर करण्यात आलेले पुरावे विधानसभा अध्यक्षांनी विचारात घेतले नाही. इतकेच काय तर ठाकरे गटातील आमदारांनी स्वेच्छेने पक्षाचे सदस्यत्व सोडले होते, हे लक्षात घेण्यात विधानसभा अध्यक्ष अपयशी ठरले, असे याचिकेत नमूद करण्यात आले आहे.



### सात महिन्यानंतर सुनावणीचा आग्रह का? ठाकरे गटाचा सवाल

सात महिन्यानंतर तातडीच्या सुनावणीचा आग्रह का केला जातोय? असे म्हणत उध्दव ठाकरे गटाचे वकील विनयकुमार खातू यांचा आक्षेप झाला आहे. न्यायमूर्ती अतुल चांदुरकर यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाकडून ६ ऑगस्टला सुनावणी घेण्याचं निश्चित केले आहे. आमदारांचा कार्यकाल सप्टेंबरअखेरीस संपत आहे. आमदारांचा कार्यकाल संपण्याआधी सुनावणी झाली नाही तर याचिका निष्प्रभ ठरेल,त्यामुळे अचानक तातडीची सुनावणी घेण्यासाठी विनंती याचिकाकर्त्यांनी केली आहे.




## ठाकरेंच्या शिवसेनेचा आक्रमकपणा रोखण्यासाठी 'मोठ्या भावाची' टीम तयार

# जागा वाटपाच्या चर्चेसाठी काँग्रेसकडून समिती जाहीर

**मुंबई : लोकसभा निवडणुकांत मिळालेल्या घवघवीत यशानंतर आणि महाविकास आघाडीत मोठा भाऊ ठरल्यानंतर काँग्रेस पक्षाने आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. महाविकास आघाडीतील घटकपक्षांशी वाटघाटी करुन अंतिम जागावाटपाचे सूत्र निश्चित करण्यासाठी काँग्रेस पक्षाने समितीची स्थापन केलेली असून प्रादेशिक समतोल साधत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सात तर मुंबई विभागीय काँग्रेस कमिटीचे तीन असे एकूण दहा सदस्य आहेत.**



अवघ्या काही महिन्यांवर महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक येऊन ठेपली आहे. योग्य रणनीती आखून निवडणुकीला सामोरे गेल्यास लोकसभेप्रमाणे यश मिळेल, अशा आशावाद काँग्रेस नेते व्यक्त करत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर विधानसभा जागावाटपाचे सूत्र निश्चित करून उमेदवारांना प्रत्यक्ष मतदारसंघात अधिक वेळ मिळेल परिणामी अंतिम निकालात त्याचे प्रतिबिंब उमटेल, असे काँग्रेस नेते सांगत आहेत. त्याचमुळे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या अनुमतीने काँग्रेसचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी ही समिती जाहीर केली.

### समितीमध्ये कुणाकुणाचा समावेश?

काँग्रेसने जागा वाटपासाठीच्या वाटाघाटीसाठी नेमलेल्या समितीमध्ये काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, माजी मंत्री आरिफ नसीम खान, माजी मंत्री सतेज पाटील यांचा समावेश आहे. तर मुंबई विभागीय काँग्रेस कमिटीमधून मुंबई काँग्रेसचे अध्यक्षा वर्षा गायकवाड, मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष भाई जगताप, माजी मंत्री असलम शेख यांचा समावेश आहे. या समितीमध्ये सामाजिक आणि प्रादेशिक समतोल राखण्याचाही काँग्रेसने पुरेपूर प्रयत्न केला आहे. याआधी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांची एकाधिकारशाही असल्याची पक्षात दबक्या आवाजात चर्चा व्हायची. यावेळी मात्र प्रादेशिक आणि सामाजिक अशी सांगड घातल्याने सर्वसंमतीने निर्णय होतील, असा वरिष्ठांचा मानस आहे.

### 'अच्छे दिन' आल्यानंतर इच्छुकांची संख्या वाढली

महाविकास आघाडीत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील जागावाटपासाठीच्या चर्चांना वेग आला आहे. कोणत्या जागांवर लढायचे, कोणत्या जागा आपल्यासाठी अनुकूल आहेत तसेच इतर पक्षातील कोणते नेते गळाला लागू शकतात, अशा बेरजेच्या राजकारणाची चाचपणी देखील सर्वच पक्षात सुरू आहे. काँग्रेस पक्षाला लोकसभा निकालांत 'अच्छे दिन' आल्यानंतर इच्छुकांची संख्याही वाढली आहे. विधानसभेच्या तोंडावर जागावाटपाचे गुऱ्हाळ सुरू ठेवून पक्षाला बसणारा संभाव्य फटका टाळण्यासाठी आत्तापासून निवडणूक रणनीती आखण्याचे पक्षातील वरिष्ठांचे आदेश आहेत.













ठाणे, शनिवार दि. २७ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ८९ पाने : ८, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®
दैनिक महाराष्ट्र सम्राट
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध
संपादक : चंद्रकांत भोईटे





शेतकऱ्यांना ५ वर्ष मोफत वीज मिळणार, सरकारनं काढला जीआर

...पान १ वर



पोलिसांच्या ३१६ घरांची योजना लवकरच कार्यान्वित होणार

...पान ६ वर

# लाडकी बहीण योजनेची गरज काय ?-वित्त विभाग

मुंबई: आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारच्या नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा करण्यात आली होती. या योजनेसाठी पात्र ठरणाऱ्या २१ ते ६५ वयोगटातील महिलांना महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. राज्यातील तब्बल २ कोटी महिला या योजनेसाठी पात्र ठरु शकतात. साहजिकच या योजनेमुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर मोठा आर्थिक बोजा पडणार आहे. महायुती सरकारकडून विशेषत: शिंदे गटाकडून या योजनेचा सध्या प्रचंड गाजावाजा केला जात आहे. मात्र, अजित पवार मंत्री असलेला अर्थविभागच या योजनेसाठी राजी नव्हता, अर्थखात्याने ही योजना सुरु करण्यास विरोध दर्शविला होता, अशी कुजबुज आता प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात सुरु आहे. महायुतीच्या नेत्यांकडून याबाबत सगळे आलबेल असल्याचे दाखवले जात असले तरी प्रत्यक्षात अर्थ खात्याने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला तीव्र विरोध केल्याची माहिती आता समोर येत आहे. मंत्रिमंडळ बैठकीत योजना पास करण्याच्या आधी अर्थ विभागाने यावर आक्षेप नोंदवले होते.

## मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबाबत अर्थ विभागाचे कोणते आक्षेप ?

- योजनेसाठी दर वर्षी ४६ हजार कोटी रुपये कुठून आणणार ? या संदर्भातील तरतूद कशी करायची ?
- राज्याची आर्थिक स्थिती बरी नाही, राज्यावर ७.८ लाख कोटींचे कर्ज असताना ही योजना अन्न कितपत योग्य आहे
- मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा होण्यापूर्वीच योजनेसाठी ४,६७७ कोटी मंजूर कसे ?
- महिलांसाठी आधीच सामाजिक न्याय,आदिवासी विकास,महिला-बालकल्याण अनेक योजना आहेत.
- एकाच लाभार्थ्याला दोन-दोन योजनांचा लाभ मिळण्याची शक्यता
- योजनेच्या व्यवहार्यतेचा वरचेवर आढावा घेतला पाहिजे
- मुलगी १८ वर्षांची होताच, १.१ लाख रुपये देतो, त्यासाठी वर्षाला १२५ कोटी लागतात
- प्रशासकीय खर्चासाठी योजनेच्या ५ टक्के म्हणजे २२२३ कोटी रुपयांचा खर्च अवास्तव आहे.

## तरीही लाडकी बहीण योजना राबवणार, धैर्यशील मानेंचं वक्तव्य

लाडकी बहीण योजनेला अर्थखात्याचा विरोध असल्याच्या चर्चे वर शिंदे गटाचे खासदार धैर्यशील माने यांनी भाष्य केले होते. त्यांनी म्हटले होते की, ही एक तांत्रिक गोष्ट असते. घेतलेल्या निर्णयाशी सरकार कटिबद्ध आहे. बहिणींच्या खात्यावर पैसे यायला सुरुवात झालीय. ही आमच्या शासन काळातील योजना आहे. आमचे सरकार जेव्हा येईल, तेव्हादेखील आम्ही ही योजना चालू ठेवणार आहोत. जे विरोध करत आहेत तेच लोक महिलांचे जास्त अर्ज भरून घेत आहेत. आतापर्यंत १ कोटी महिलांनी या योजनेसाठी अर्ज भरले आहेत. एखाद्या योजनेसाठी अर्ज भरण्याचा हा उच्चांकी आकडा आहे, असे धैर्यशील माने यांनी सांगितले होते.



## अर्थविभागाला घेतले फैलावर

या योजनेवरील खर्चावर अर्थविभागाने चिंता व्यक्ती केली आहे. यापूर्वीच महिला आणि मुलींसाठी योजना असताना ही योजना कशासाठी, असा सवाल वित्त विभागाने केला होता. त्यावर अर्थ विभागाला सुधीर मुनगंटीवार यांनी चांगले फैलावर घेतले. अर्थविभागाने चिंता व्यक्त करण्याची गरज नाही, कुठलीही फाईल वित्त विभागाकडून येते, १७ -१८ लाख कर्मचाऱ्यांना वेतनाचा भार येत नाही. मग दोन- अडीच कोटी महिलांना लाभ देताना अडचण कशी येते, असा चिमटा त्यांनी खात्याला काढला. तर लाडकी बहीण योजनेचा निर्णय सरकारने घेतला आहे. कर्जाचा बोजा आहे म्हणून योजना राबवायचा नाहीत अस काही नसतं. ही योजना राज्यातील कष्टकरी महिलांसाठी आहे. अर्थ खात्याने त्यांचं काम केलं असेल पण योजना राबवली जाणार हे निश्चित आहे.



## रक्षा बंधनाला मिळणार दोन हप्ते

या योजनेच्या पहिला हप्ता रक्षाबंधनाच्या दिवशी महिलांना मिळणार आहे. ज्या महिला पात्र ठरतील त्या महिलांना जुलै आणि ऑगस्टचे (पान ४ वर)





ठाण्यातील टोईंग व्हॅन विरोधात तीन पेट्रोल पंप याठिकाणी लक्षवेधी बॅनर लावण्यात आला आहे, सध्या हा बॅनर ठाणेकरांचे लक्ष वेधतोय. समाजसेवक संगम डोंगरे यांनी बॅनरच्या माध्यमातून टोईंगचा प्रश्न बॅनरच्या माध्यमातून मांडला आहे. सातत्याने ठाण्यातील टोईंग व्हॅनचा प्रश्न ऐरणीवर असल्याचे पाहायला मिळत होते. नागरीकांना टोईंग व्हॅन लुटत असल्याचा आरोप देखील समाजसेवक संगम डोंगरे यांनी केलाय. अनेकदा पाठपुरावा करुन देखील टोईंग व्हॅन संदर्भात कारवाई होत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केलीये. (छाया - मनोज सिंह)

### आनंद विश्व गुरुकुल मध्ये महाराष्ट्र गर्ल्स बटालियन युनिटमार्फत

# २५ वा कारगिल विजय दिवस साजरा

ठाणे - कारगिलच्या लढाईत भारताने मिळवलेला विजय 'कारगिल विजय दिवस' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी कारगिलच्या लढाईत शहीद झालेल्या वीरांच्या आठवणी जागवल्या जातात. कारगिल विजय दिवस हा भारतीय सैन्यांच्या शौर्याची आठवण सदैव जागृत ठेवणारा दिवस असून देशाबद्दल त्यागाची आणि सैनिकांप्रती कृतज्ञतेची भावना जागृत करणारा दिवस आहे. संपूर्ण देशात २६ जुलैला कारगिल विजय दिवस साजरा केला जात आहे. इतिहासात हा विजय सोनेरी अक्षरात लिहिण्यासारखाच आहे.



कारगिल युद्धात शहीद झालेल्या भारतीय सैन्याच्या शूर अधिकाऱ्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'कारगिल विजय दिवस' देशभरात साजरा करण्यात येतो. याच दिवशी भारतीय सैन्याच्या जवानांनी कारगिलमध्ये विपरित परिस्थितीत शत्रूसैन्याला नामोहरम केले. कारगिलच्या शहिदांचे नागरिक सन्मानाने स्मरण करण्याबरोबरच, देशातील सैनिकांचा आदर करण्याचा हा दिवस असतो. देशासाठी शहीद झालेल्या वीरांच्या शौर्याची व बलिदानाची आठवण करून आपली देशभक्ती जागृत करण्यासाठी कारगिल विजय दिवसाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन देशभरात करण्यात येत असते. भारतीय सैन्याचे देशप्रेम, स्वयंशिस्त, श्रद्धा, शारीरिक व मानसिक सामर्थ्य, तसेच वीरवृत्ती उल्लेखनीय असते आणि त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आपण देशहितासाठी कार्य करणे आवश्यक आहे. सैनिकांनी केलेल्या त्यागाबद्दल आपण सर्वांनी कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे.

आज आनंद विश्व गुरुकुल मध्ये महाराष्ट्र गर्ल्स बटालियन युनिटच्या मार्फत कॅप्टन डॉ सुरेश वंजारी यांच्या उपस्थितीत २५ वा कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला यावेळी संस्थेचे अध्यक्ष विलास ठुसे, सचिव डॉक्टर प्रदीप ढवळ, खजिनदार (पान ४ वर)



# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## डोंबिवलीत मानवनिर्मित महापूराचे संकट

डोंबिवली पश्चिमेत देवीचापाडा, कुंभारखाणपाडा, गणेशनगर भागात असणाऱ्या झोपडयांना महापुराचा विळखा बसला आहे. याचे कारण म्हणजे हे निसर्गनिर्मित संकट नसून मानवनिर्मित संकट आहे. या भागातील खारफुटी नष्ट करून उभारलेल्या सुमारे पाच हजाराहून अधिक बेकायदा चाळी दोन दिवसांपासून महापुराच्या पाण्याच्या विळख्यात आहेत. उपनगरात विविध बांधकामे केली जातात. ही बांधकामे करताना हरित पट्ट्यात करून तेथील खोलगट जागेत राडारोडा टाकून भराव केला जातो. परंतु पावसाळ्यातील अतिरिक्त पाणी यामुळे हरितापट्ट्यातील चालींत घुसून पूरपरिस्थिती निर्माण होते. कल्याण - डोंबिवली महापालिका प्रशासनाला हे ठाऊक नसेल हे हास्यास्पद वाटते. कारण बिल्डर आणि प्रशासनाची युती झाली की, सर्वसामान्य घर खरेदीदारांची फसवणूक होते. सर्वसामान्य माणूस यात नागवला जातो. यावर कडोंमपा प्रशासन व आयुक्त उपाययोजना करून संबंधितांवर कारवाई करणार का, हा प्रश्न अनुत्तरित आहे. डोंबिवलीत देवीचापाडा येथे खाडी किनारा बुजवून पाच हजाराहून अधिक बेकायदा चाळींची उभारणी करण्यात आली आहे. डोंबिवली पश्चिमेतील देवीचापाडा, कुंभारखाणपाडा, गणेशनगर भागात गेल्या पंधरा वर्षाच्या कालावधीत उल्हास नदीचा खाडी किनाऱ्यावर मातीचे भराव टाकून, या भागातील खारफुटी नष्ट करण्याचे पाप येथिल काही विकासकानी केले आहे. परंतु यामुळे ऐन पावसाळ्यात सर्वसामान्य माणसाला अनेक त्रासांना सामोरे जावे लागते. काही विकासकांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी उभारलेल्या सुमारे पाच हजाराहून अधिक बेकायदा चाळी याआता महापुराच्या पाण्याच्या विळख्यात आहेत. सध्या सर्वसामान्य मराठी माणूस मुंबईतून कल्याण, अंबरनाथकडे रहिवासासाठी जाऊ लागला आहे. याचे कारण मुंबई महानगरात टोलेजंग गगनचुंबी टॉवर्स निर्माण झाले. विकास करण्याच्या नादात घरांच्या किमतीही महागल्या. त्यामुळे सर्वसामान्य माणसाकडे मुंबईतील महागडे फ्लॅट घेण्याची कुवत राहिली नसल्याने तो उपनगरात स्थिर होत आहे. कमी किमतीत मिळालेले घर दरवर्षी पुराच्या पाण्यात जात असल्याने या भागातील फसवणूक झालेले घर खरेदीदार आता त्रस्त झाले आहेत. परंतु महापालिका प्रशासनाला त्याचे काहीच घेणेदेणे नाही असे दिसते. डोंबिवली शहरातील सर्वात मोठा हरितपट्टा म्हणून पश्चिमेतील देवीचापाडा, कुंभारखाणपाडा, गणेशनगर, मोठागाव, सातपूल, कोपर भाग म्हणून ओळखला जात होता. खारफुटीची घनदाट जंगले या भागात पूर्वी होती. विविध प्रकारची जैवविविधता येथे होती. विविध प्रकारचे स्थलांतरित पक्षी या भागात पाहण्यास मिळत होते. पर्यावरण अभ्यासक, निसर्ग छायाचित्रकार यांचा या भागात सतत राबता असायचा. परंतु निसर्गनिर्मित पाचूच्या बेटांवर भूमाफीयांची नजर पडली आणि होत्याचे नव्हते झाले. सिमेंटच्या चाळींचे जंगल झाले. येथील निसर्ग नष्ट करण्यास विविध भूमाफियांसोबत महापालिका प्रशासन, पोलीस प्रशासन आणि स्थानिक राजकारणी जबाबदार असल्याचे दिसते.खरे तर याबाबत राज्य सरकार व उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली पाहिजे. सर्वसामान्यमाणसाची फसवणूक करत भूमाफिया बिनधास्त आहेत. भूमाफियांनी या उद्योगात भरपूर माया जमवली असून येथील निसर्ग नष्ट करून चाळी बांधल्या. पालिका अधिकरी, पोलीस यांच्या संगनमताने भूमाफियांनी देवीचापाडा परिसरातील खारफुटीचे घनदाट जंगल नष्ट केले. खाडी किनारा भागात मातीचे २० फूट उंचीचे भराव करून या भागात बेकायदा चाळींची उभारणी केली. या चाळींमधील घरे तीन ते पाच लाखाला सामान्यांना विकली. या भागात मोठा नवमतदार निर्माण झाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी या भागात पाणी, रस्ते, पथदिवे यांची उभारणी करून दिली आहे. प्रत्येकजण आपला फायदा पाहतो, पण सर्वसामान्य माणसाचे यात नुकसान होत आहे. सर्वसामान्य माणसाला कुणी वाली शिल्लक नसल्याचे दिसत आहे. या भागातील भूखंडावर एक धार्मिक स्थळ राजकीय आशीर्वादाने काही मंडळींनी उभारले आहे. पालिकेचा टिटवाळा ते डोंबिवली देवीचापाडा, मोठागाव ते कोपर, आयरे, काटई-हेदुटणे बाह्य वळण रस्ता या बेकायदा चाळींच्या भागातून जात आहे. महापालिकेची उद्यान, बगिचे अशा अशा अनेक सुविधांची येथे आरक्षणे आहेत. सुमारे ४० एकरहून अधिक भौगोलिक क्षेत्र असलेला हा पट्टा आहे. कुंभारखाणपाडा भागात खाडी किनारी पोहच रस्ते नसताना, पालिकेच्या बांधकाम परवानग्या न घेता शिवसावली नावाने दहा बेकायदा इमारतींचा गृहप्रकल्प कुंभारखाणपाडा भागात खाडी किनारी सुरू आहे. गणेशनगर, खंडोबा मंदिर परिसरात पालिकेच्या परवानग्या न घेता बेकायदा इमारती खाडी परिसरात उभारल्या जात आहेत. या टोलेजंग इमारती उभ्या राहत असताना पालिका अधिकारी फक्त तात्पुरती कारवाई करून या बेकायदा बांधकामांना अभय देत आहे, असा आरोप काही सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे. अशाच पाच हजाराहून अधिक चाळी आयरे, कोपर पूर्व भागात आहेत. पालिकेने या बेकायदा बांधकामांवर ऑक्टोबरनंतर कारवाई करून या भागातील पालिकेचे भूखंड, सरकारी जमिनी ताब्यात घेण्याची मागणी जागरूक नागरिकांकडून केली जात आहे. काही पालिका अधिकाऱ्यांनी मात्र, आम्ही बेकायदा चाळींवर कारवाई करतो पण आमच्यावर राजकीय दबाव आणून कारवाईत अडथळा आणला जातो, असे म्हणून हात वर केले आहेत. या भागात दरवर्षी महापुराचे पाणी घुसते. पण याबाबत जी व्यवस्था निद्रिस्त झाली आहे, ती जागी होईल काय ?

### रक्षा बंधनाला मिळणार दोन हप्ते

**(पान ३ वरून)** दोन्ही हप्ते रक्षाबंधनाच्या दिवशी दिले जाणार आहेत. ही योजना कायमस्वरूपी सुरू राहणार असल्याचे मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी सांगितलं, राज्य सरकारने महिलांसाठी चांगली योजना राबवली असून या योजनेसाठी जास्तीत जास्त महिलांनी अर्ज करावा असं आवाहन मंत्री डॉ. गावित यांनी केलं आहे.

### २५ वा कारगिल विजय दिवस साजरा

**(पान ३ वरून)** अक्षर पारसनीस, डॉ हर्षला लिखिते, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य डॉ. सीमा हर्डीकर, विधी महाविद्यालयाचे प्राचार्य ड. सुयश प्रधान, प्रायमरीच्या प्राचार्या डॉ. वैदही कोळंबकर, नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या मयुरी पेंडसे, कौशल्य विकासच्या प्रमुख मयुरा गुप्ते, व्यवस्थापनाचे अन्य सदस्य, एनसीसी प्रमुख प्रा. धनश्री गवळी, प्रा. दिपीका तलाठी, प्रा. सागर जाधव शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी वर्ग उपस्थित होते. कॅप्टन सुरेश वंजारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कारगिल युद्ध आणि त्या युद्धातील प्रसंग मांडत असताना आपल्याला आपल्या देशातील सैन्याचा अभिमान वाटला. सगळेच भारावून गेले होते. ते आपल्या मनोगतात असे म्हणाले कारगिल विजय दिवस हा देशासाठी अभिमानाचा दिवस असून या युद्धात शहीद झालेल्या तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जवानांप्रती समाज आणि शासन कृतज्ञ राहील. कारगिल युद्धात बलिदान देणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करतानाच त्यांच्या शौर्याचे स्मरण करण्यासाठी २६ जुलै हा कारगिल विजय दिवस म्हणून साजरा करण्याचा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे. देशासह देशवासियांचे संरक्षण करण्यासाठी सीमेवर सैनिक अहोरात्र पहारा देत असतात. त्यावेळी आपले सैनिक स्वत:सह कुटुंबाचाही विचार करीत नाही, फक्त देशाचाच विचार करतात. देशासाठी प्राणार्पण केल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांना आधार देण्यासह त्यांची जबाबदारी उचलणे हे आपले सामाजिक कर्तव्यच आहे.

# १० मोबाईल मेडिकल युनिट मार्फत ८१ अतिदुर्गम भागात आरोग्य सेवा

**जिल्ह्यात १ ऑगस्ट पासून ०९ मोबाईल मेडिकल युनिट सुरू होणार**

**ठाणे - केंद्रीय मंत्रीमंडळाने प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानाला (पीएम-जनमन) मंजुरी दिली. विशेषत: वंचित आदिवासी समुहाच्या (पीव्हीटीजी) (कातकरी, कोलम व मारिया गोंड) सामाजिक-आर्थिक परिस्थतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रधानमंत्री पीव्हीटीजी विकास मिशन सुरू करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत आरोग्य आणि पोषण सारख्या मुलभुत सुविधा देण्याबाबत लक्ष केंद्रित करण्यात येत असून ठाणे जिल्ह्यात अदिवासी व अतिदुर्गम भागात १ मोबाईल मेडिकल युनिट मुरबाड व शहापूर तालुक्यात सुरू असून, ०९ मोबाईल मेडिकल युनिट १ ऑगस्टपासून सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी दिली.**





मोबाईल मेडिकल युनिट उपक्रमातंर्गत ठाणे जिल्ह्यात ८१ दुर्गम अणि अतिदुर्गम भागामध्ये आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण १० मोबाईल मेडिकल युनिट तयार करण्यात आले आहेत. मोबाईल मेडिकल युनिट हा प्रकल्प सेवा पुरवठादारामार्फत चालवण्यात येत असून प्रकल्पाअंतर्गत दुर्गम अणि अतिदुर्गम भागातील लोकांकरीता या मोहिमेअंतर्गत १८ प्रकारचे औषध व १२ प्रकारचे प्रयोगशाळा तपासणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोबाईल मेडिकल युनिट प्रकल्पाअंतर्गत मुरबाड तालुक्यात ३, शहापुर तालुक्यात ३, भिवंडी तालुक्यात २, अंबरनाथ तालुक्यात १ व कल्याण तालुक्यात १ असे एकूण १० मोबाईल मेडिकल युनिट सुरू करण्यात येणार आहे. या प्रकल्पाअंतर्गत मोबाईल मेडिकल युनिटद्वारे गावामध्ये आरसीएच, लसीकरण, सिकलसेल रोग, औषधे आणि निदान एनसीडी इत्यादी सर्व आरोग्य सेवा रुग्णांना गावात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रत्येक मोबाईल मेडिकल युनिटसाठी वैद्यकीय अधिकारी, जीएनएम, लॅब टेक्नीशियन व फॉर्मासिस्ट असे एकूण ४ अधिकारी व कर्मचारी कार्यरत असणार आहेत.

दि. १ जुलै ते २३ जुलै दरम्यान शहापूर आणि मुरबाड तालुक्यातील मोबाईल मेडिकल युनिट मार्फत ३८ अदिवासी व अतिदुर्गम भागात आरोग्य सेवा देण्यात आल्या असून एकूण ३ हजार २६६ विविध आरोग्य सेवा रुग्णांना देण्यात आल्या आहेत.

**सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ, ठाणे (रजि.) यांच्यावतीने**

# रविवारी विद्यार्थी दत्तक योजना व यशस्वी विद्यार्थी गुणगौरव सोहळा

ठाणे - सुधागड तालुक्याच्या व तालुक्यातील रहिवाशांच्या विकासासाठी झटणारी संस्था सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ, ठाणे (रजि.) यांच्यावतीने रविवार २८ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता विद्यार्थी दत्तक योजना व यशस्वी विद्यार्थी गुणगौरव सोहळा संस्थेचे अध्यक्ष श्री. विठ्ठल घाडगे यांचे अध्यक्षतेखाली सहयोग मंदिर, घंटाळी रोड, ठाणे येथे आयोजित केला आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी, पालकांनी व तालुकावासीयांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात येत आहे.

विशेष म्हणजे यंदा दैनिक जनादेशचे संपादक कैलाश म्हापदी यांना 'सुधागड मित्र' पुरस्काराने तर सुधागडातील ज्येष्ठ समाजसेवक आत्माराम खरीवले यांना 'जीवनगौरव' पुरस्कार व मास्टर्स आर्किटेक्ट (आर्किटेक्ट ५वर्षे + मास्टर्स २ वर्षे) पदवी प्राप्त केलेल्या कु. पूर्वा दिपक दळवी हिचा 'विशेष पुरस्कारा'ने तर वकीली सनद मिळविल्याबद्दल स्वप्निल अनंत कालेकर आदींचा सन्मान करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रमास सुधागड तालुका मराठा समाज अध्यक्ष धनंजय साजेकर, सुधागड मित्र, (मार्गदर्शक) विजय तांबे, सुरेश मेश्राम, सुधागडमित्र तथा समाजसेवक विजय सागळे, उद्योजक तथा समाजसेवक अंजली व वसंत केळकर, सुधागड तालुका मराठा समाज कार्याध्यक्ष बळीराम निंबाळकर सर, सुधागड तालुका मराठा समाज सरचिटणीस सुजित सदाशिव बारस्कर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी दहावी, बारावी आणि उच्च शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच उपस्थितांचे स्वागत, विशेष पुरस्कारने सन्मानित मान्यवरांचा सत्कार, विद्यार्थी दत्तक योजने अंतर्गत आर्थिक मदतीचे वितरण, इ. १ ते ९वी विशेष गुण संपादत विद्यार्थी बक्षिस वितरण, पदवीधर (डीग्री) परिक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार व पारितोषिक वितरण, २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात सुधागड तालुक्यातील ग्रामीण भागातील पितृछत्र हरपलेल्या दिव्यांग व गरीब गरजु विद्यार्थ्यांना शालेय वार्षिक फी, शालयेपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे. तरी सर्व सुधागड तालुकावासियांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल घाडगे व सरचिटणीस राजू पातेरे यांनी केले आहे.

# अर्थसंकल्पाला दहा पैकी दहा गुण

पनवेल - मोदी ३.० सरकारच्या केंद्रीय अर्थसंकल्प २०२४ विषयी मत मांडताना नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अभियंता आशिषकुमार चौहान यांनी एकंदरीत १० पैकी १० गुण असल्याची प्रतिक्रिया दिली.



चौहान यांनी या अर्थसंकल्पवर बोलताना म्हंटले की, आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी माननीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला अर्थसंकल्प भारतातील रोजगार निर्मितीला मोठी चालना देणारा आहे. रोजगारनिर्मितीसाठी सरकारी क्षेत्रांबरोबरच खासगी क्षेत्रांनाही प्रोत्साहन दिले जाणार आहे. भारत पहिल्या क्रमांकाचे स्टार्ट अप देश व्हावा आणि देशात जास्तीत जास्त उद्योजक तयार व्हावेत यासाठी एंजल करात सवलत दिली जाणार आहे तसेच मुद्रा कर्ज योजनेची मर्यादा प्रती व्यक्ती १० लाख रुपयांवरून २० लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यांनी भारताच्या कर्मचारी वर्गातील स्त्रियांच्या वाढत्या प्रमाणावरही लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे भारताला देशातील कर्मचारी वर्गातील तरुण स्त्रियांचे प्रमाण आणखी वाढवून लोकसंख्येमुळे मिळणारा लाभांश आणखी विस्तारणे शक्य होईल. कौशल्य विकासाला रोजगार निर्मितीचा भाग बनवण्याची अभिनव संकल्पना त्यांनी मांडली असून दरम्यान पायाभूत सुविधांवरील खर्च अबाधित ठेवला आहे. वित्तीय तूट ५.१ टक्क्यांच्या अपेक्षेपेक्षा कमी करत ४.९ टक्क्यांवर आणली आहे. या सर्व गोष्टी प्रत्यक्ष कर किंवा अप्रत्यक्ष कररचनेला फारसा धक्का न लावता साधता येणार असल्यामुळे भारतातील दीर्घकालीन कर्ज रेटिंग सुधारेल व २०२५-२६ मध्ये वित्तीय तूट ४.५ टक्क्यांपर्यंत आणण्याचा मार्ग सुकर होईल.

# पुरात वाहून जाणाऱ्या तरुणाला गावकऱ्यांनी वाचवलं



कल्याण: कल्याण तालुक्यातील रायता नदीच्या पुरात वाहून चाललेल्या तरुणाला रायते गावकऱ्यांनी वाचवलं आहे. आणे गावातील तरुण घरी जात असताना नदीच्या पुरात वाहून गेला. पुराच्या पाण्यात वाहून जात असताना त्याने एका झाडाचा आसरा घेतला आणि तो त्या झाडावर चढून बसला. रायते गावाजवळ नदीच्या जवळ एक तरुण झाडाला अडकलेला पाहून गावकऱ्यांनी दोरीच्या आधारे त्याचा जीव वाचवला आहे. सदर घटना मोबाईल कॅमेरात कैद झाली असून याचा व्हिडिओ आता व्हायरल झाला आहे. इब्राहिम शेख असं या वाचवलेल्या तरुणाचे नाव आहे.

दरम्यान, गुरुवारी कर्जत तालुक्यात एक तरुण उल्हास नदीच्या पुराच्या पाण्यात पडला. प्रवाहात तो वाहत जात असताना देखील त्याने वाचण्यासाठी प्रवाहाच्या विरोधात पोहत राहिला आणि एका ठिकाणी अडकून पडला. तेव्हा प्रशासनाने अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी बचाव पथकाला पाचारण केले. पथकाने पुराच्या पाण्यात उतरत या तरुणाला सुरक्षित बाहेर काढले आहे. या तरुणासाठी हे बचाव पथक देवदूत ठरले आहेत.

तर दुसरीकडे गुरुवारी दुपारी दोन इसम बारावी डॅमच्या बॅक वॉटरमध्ये टाकीची वाडी येथून वाहून गेले असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. महसूल विभाग, पोलीस व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तसेच अग्निशामक दलाच्या जवानांकडून घटनास्थळी शोधकार्य सुरू केले होते.

### ■ रायते पुलावर डांबर वाहून गेले...

गुरूवारी रौद्र रूप धारण करणाऱ्या उल्हास नदीची पाणी पातळीत शुक्रवारी घट दिसून आली. उल्हास नदीची पाणी पातळी सकाळी १४.७० मीटर इतकी होती. त्यामुळे बदलापूर शहरावरचे पूर संकट टळले आहे. गुरुवारी उल्हास नदी आहे १८.८० मीटर इतकी सर्वोच्च पाणी पातळी गाठली होती. त्यामुळे शहरात पूरस्थिती निर्माण झाली होती. मात्र, कल्याण अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावर रायते येथील पुलावर पाणी साचल्याने गुरुवारी वाहतूक ठप्प होती. शुक्रवारी सकाळी पाणी ओसरल्यावर पुलावर खड्डे पडले असून डांबर वाहून गेले आहे. कठडे तुटल्याने अपघात होण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे हा मार्ग दुरुस्तीसाठी बंद करण्यात आला होता.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

घनकचरा व्यवस्थापन विभाग

घनकचरा व्यवस्थापनाबाबत

अधिसूचना क्र. एस.ओ. १३५७(इ) दिनांक ०८.०४.२०१६ अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ लागू केले आहेत. या नियमाअंतर्गत प्रत्येक कचरा निर्मात्याने (नागरिकांनी)विघटनशील (कुजणारा किंवा ओला), अविघटनशील (न कुजणारा किंवा सुका) व घरगुती धोकादायक असा वर्गीकृत केलेला कचरा स्वतंत्रपणे देवून स्थानिक स्वराज्य संस्थेने नेमून दिलेल्या व्यक्तीकडे/अभियोक्ता देणे बंधनकारक आहे. (१०० किलो पेक्षा जास्त कचरा उत्पादक वगळून) इतर कचरा उत्पादकांनी या नियमांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. ठाणे शहरातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ मध्ये अभिप्रेत असलेली कार्यवाही करुन सहकार्य करावे. या नियमांचे उल्लघंन झाल्यास नियमाप्रमाणे कठोर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ठामपा/पिआरओ/घ.क.व्य/१९९/२०२४-२५ सही/-

दि:२६.०७.२०२४ उपआयुक्त

Pls visit our official web-site घनकचरा व्यवस्थापन विभाग

www.thanecity.gov.in ठाणे महानगरपालिका, ठाणे

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/12704/18/24
Inquiry/case No. : ACC/III/810/2024
Name of the Trust : बाबा मखानशाह लबाना ट्रस्ट

**Address of the Trust :** १९/०१, बी. के. नं. ६२८ समोर, ओ. टी. सेक्शन, गुरुद्वाराच्यासमोर, उल्हासनगर, ठाणे, ठाणे, उल्हासनगर, उल्हासनगर

**Name of the Applicant :** श्री. मानस माणिक संतरा,

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 23/07/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

# कल्याण (पश्चिम) येथील T ८० व नेव्हल गॅलरी प्रकल्पास भेट !

कल्याण - कमांडर कलेश मोहनन, ऑफिसर इनचार्ज Naval History Division यांची भारतीय नौसेना यांच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात येत असलेल्या कल्याण (पश्चिम) येथील T ८० व नेव्हल गॅलरी प्रकल्पास भेट !

आज भारतीय नौसेनेच्या नेव्हल हिस्टरी डिव्हीजनचे कमांडर कलेश मोहनन, Naval History Division व लेफ्टनंट कमांडर अनुपमा थपलियाल यांनी ड्घऊड च्या ढ-८० तसेच नेव्हल गॅलरीप्रकल्पास भेट दिली. महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी कमांडर कलेश मोहनन आणि लेफ्टनंट कमांडर अनुपमा थपलियाल यांना T-80 च्या प्रकल्पाची संपूर्ण माहिती दिली.

कमांडर कलेश मोहनन व लेफ्टनंट कमांडर अनुपमा थपलियाल यांनी Smart Kalyan Dombivli Development Corporation Ltd (SKDCL) च्या कार्यालयासही भेट देऊन भारतीय नौसेना यांच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात येत असलेल्या नेव्हल गॅलरी च्या कामाचा आढावा घेतला. यावेळी SKDCL चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रल्हाद रोडे , शहर अभियंता अनिता परदेशी, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांनी प्रकल्पाची संपूर्ण माहिती उपस्थित मान्यवरांना दिली. यासमयी, ड्घऊड चे उपअभियंता संदिप तांबे व इतर अधिकारी उपस्थित होते.

कमांडर मोहनन यांनी नेव्हल गॅलरीच्या तयार होणा-या कलाकृती आणि इतर कामांच्या प्रगती बद्दल समाधान व्यक्त केले असून शुभेच्छा दिल्या.

आजच्या कारगिल विजय दिनाच्या दिवशी भारतीय नौसेनेच्या नेव्हल हिस्टरी डिव्हीजनचे कमांडर कलेश मोहनन, Naval History Division व लेफ्टनंट कमांडर अनुपमा थपलियाल यांची SKDCL च्या ढ-८० या प्रकल्प स्थळी भेट हा एक दुग्ध शर्करा योगच म्हणावा लागेल.




**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

घनकचरा व्यवस्थापन विभाग

जाहीर सूचना

केंद्र शासनाने जाहिर केलेल्या "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत ठाणे महानगरपालिका क्षेत्रात "सफाई मित्र" सुरक्षा चॅलेंज राबविले जाते. ठाणे महानगरपालिकेने सेप्टीक टाकी व भुयारी गटारांची वेळोवेळी सफाई करणेसाठी नागरीकांकरीता १४४२० हा हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून दिलेला आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रात खालील कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत असते

- Manual Scavenging Act.
- Prohibition of Employment as Manual Scavengers and their Rehabilitation Act(PEMSRA) 2013.
- Ban on manual hazardous entry (without safety gear).
- Levying User Charges for desludging services

या अनुषंगाने सदर उपाययोजना यशस्वीरीत्या राबविण्यासाठी ठाणे महानगर पालिका वचनबध्द आहे. तसेच सेप्टीक टाक्यांमधील मैला व पाणी खुल्यावर टाकताना आढळल्यास ठाणे महानगरपालिकेमार्फत योग्य ती कारवाई केली जाईल. याची सर्व नागरिकांनी नोंद घेण्यात यावी.

ठामपा/पिआरओ/घ.क.व्य/१९२/२०२४-२५ सही/-

दि:२६.०७.२०२४ उपआयुक्त

Pls visit our official web-site घनकचरा व्यवस्थापन विभाग

www.thanecity.gov.in ठाणे महानगरपालिका, ठाणे

# दिव्यात नाले तुंबून अनेक ठिकाणी पाणीच पाणी ठेकेदार व स्वच्छता निरीक्षक डोंगर परदेशी यांच्यावर कारवाई करा : अभिषेक ठाकूर



दिवा : दिव्यात नालेसफाईची कामे पूर्ण क्षमतेने झालेली नाहीत.पावसाळ्यात नालेसफाई पूर्ण क्षमतेने न झाल्यामुळे अनेक सखल भागात पाणी साचलेले दिव्यात दिसत आहे दिवा प्रभाग समितीचे स्वच्छता निरीक्षक डोंगर परदेशी व ठेकेदार यांना जबाबदार धरून कारवाई करावी अशी मागणी ठाकरेंच्या शिवसेनेचे दिवा शहर युवा शहर अधिकारी अभिषेक ठाकूर यांनी केली आहे.

दिवा प्रभाग समितीचे स्वच्छता अधिकारी म्हणून डोंगर परदेशी हे कमी पडत असून दिवा शहराचा संपूर्ण पाहणी दौरा त्यांनी पावसाल्या आधी करणे अपेक्षित होते. अनेक ठिकाणी नाल्यातील पूर्ण गाळ काढला गेलेला नाही. वरच्या प्लास्टिकच्या पिशव्या काढण्यात आलेल्या आहेत. नाले पूर्ण क्षमतेने साफ न केले गेल्याने दिवा टर्निंग विभागात चंद्रंगण रेसिडेन्सी परिसरात भरपूर प्रमाणात पाणी साचून लोकांचे अतोनात हाल होत आहेत. दरवर्षी हा प्रकार पावसाळ्यात दिव्यात पाहायला मिळतो.मागील घडलेल्या घटनांवरून दिवा प्रभाग समिती स्वच्छता निरीक्षक डोंगर परदेशी धडा घेणार नसतील तर कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे अशी रोखठोक भूमिका ठाकरेंच्या शिवसेनेचे दिवा शहर युवा अधिकारी अभिषेक ठाकूर यांनी घेतली आहे.दिवा शहरात पालिका प्रशासनाचे स्वच्छता निरीक्षक डोंगर परदेशी नीट जबाबदारी पार पाडणार नसतील तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई होणे गरजेचे आहे. यामुळे प्रशासनाला शिस्त लागेल आणि दिवा शहराकडे बघण्याचा दृष्टिकोन अधिकाऱ्यांचा बदलेल असेही अभिषेक ठाकूर यांनी म्हटल आहे.दिवा शहरात जो गलिच्छपणा व अस्वच्छता अनेक ठिकाणी पाहायला मिळते त्याबाबत सुद्धा स्वच्छता निरीक्षकांनी भूमिका घेणे अपेक्षित होते मात्र ठाण्याला एक न्याय आणि दिवा शहराला एक न्याय अशा पद्धतीचे प्रशासन येथे काम करणार असेल तर अशा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे असेही अभिषेक ठाकूर यांनी म्हटले आहे.

ठामपातर्फे आजपासून ठाण्यात सुरू होणार

## पर्यावरणस्नेही गणेशोत्सव प्रदर्शन

**ठाणे : यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक असा साजरा व्हावा यासाठी ठाणे महानगरपालिकेतर्फे ठाण्यात पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४ प्रदर्शन शनिवार दिनांक २७ जुलैपासून ठामपा शाळा क्र. १९ विष्णुनगर, ठाणे येथे सुरू होत आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन सायंकाळी ५.०० वा खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते व ठाण्यातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या प्रदर्शनास जास्तीत जास्त नागरिकांनी भेट देवून पर्यावरण स्नेही गणेशोत्सव साराज करावा असे आवाहन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.**



पर्यावरणाचे संवर्धन होण्याच्या दृष्टीकोनातून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे निर्देश राज्यशासनाने दिले आहेत. या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिकेतर्फे पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४ हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. पर्यावरणस्नेही घटकांपासून तयार करण्यात आलेल्या गणेशमूर्ती तसेच पुठ्ठ्यापासून बनविलेली १० फूट उंच भव्य सिद्धिविनायक मंदिराची प्रतिकृतीच तसेच केदारनाथ मंदिराची प्रतिकृती असलेले भव्य मखर हे या उपक्रमाचे विशेष आकर्षण असणार आहे. तसेच इतर सजावटीच्या साहित्याचे प्रदर्शन व विक्री देखील या प्रदर्शनात केली जाणार आहे.

याचबरोबर महाराष्ट्रातील विविध भागांतून कुशल मूर्तिकारांनी शाडू माती, लाल माती, गोमय, पुठ्ठा तसेच कागदाचा लगदा व पर्यावरणस्नेही रंग इत्यादींपासून बनविलेल्या लोभस गणेशमूर्ती हे या उत्सवाचे आकर्षण असणार आहे. याचबरोबर पर्यावरणपूरक पदार्थांपासून बनविलेले मखर व सजावटीचे आकर्षक पर्याय येथे उपलब्ध असणार आहेत.

उत्सवादरम्यान विविध जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केले असून 'पर्यावरणपूरक उत्सव – काळाची गरज' या विषयावर तज्ञ व्यक्तींचा परिसंवाद, नागरिकांसाठी निष्णात मूर्तिकारांकडून मातीच्या गणेशमूर्ती घडविण्याची कार्यशाळा, कागद – पुठ्ठा यापासून सजावटीचे साहित्य बनविण्याचे प्रशिक्षण, शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धासोबतच विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. तसेच सेल्फी विथ बाप्पासाठी या ठिकाणी सेल्फी पॉईंटही देखील उपलब्ध केला असल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी दिली. सदरचे प्रदर्शन ४ ऑगस्ट २०२४ पर्यत सकाळी ११ ते रात्री १०.०० वाजेपर्यत नागरिकांसाठी खुले राहणार आहे.

## चालत्या एसटीचे चाक निखळले, सुदैवाने जीवितहानी टळली

वसई: एसटी महामंडळाच्या चालत्या एसटीचे चाक निखळल्याची घटना वसईत घडली आहे. गुरुवारी सायंकाळी चारच्या सुमारास वसई अर्नाळा मार्गावर प्रवास करताना वाघोली येथे ही घटना घडली. चालक व प्रवाशांनी वेळीच प्रसंगावधान राखल्याने मोठी जीवितहानी टळली आहे. विरारच्या अर्नाळा आगारातून एमएच १४ बीटी २७१८ या क्रमांकाची एसटी येथे प्रवाशांना घेऊन निघाली होती.

निर्मळ वाघोली जवळील परिसरातून प्रवास सुरु असतानाच अचानकपणे पुढील बाजूचे चाक निखळल्याची घटना घडली. बस एका बाजूने झुकत असल्याचे लक्षात येताच प्रवाशांनी चालकाला बस थांबविण्यास सांगितल्याने सुदैवाने मोठी दुर्घटना टळली आहे. या एसटी मध्ये २० ते २२ प्रवास करीत होते. या घटनेमुळे पुन्हा एकदा एसटी महामंडळाचा भोंगळ कारभार समोर आला आहे. एसटीची योग्य ती दुरुस्ती केली जात नसल्याने अशा घटना घडतात. अशा घटना घडू नये यासाठी बसेसची तपासणी करूनच सेवेसाठी मार्गावर पाठवावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# ‘राधाई’ 17 दिवसात जमीनदोस्त करा

### मुंबई उच्च न्यायालयाचे कडोंमपाला आदेश

कल्याण : डोंबिवलीतील नांदिवली पंचानंद येथील बेकायदा राधाई इमारत येत्या १२ ऑगस्टपर्यंत जमीनदोस्त करा. या कारवाईसाठी ठाणे पोलीस आयुक्तांनी कल्याण डोंबिवली पालिकेला अतिरिक्त पोलीस बळ उपलब्ध करून द्यावे, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती कमल खाता आणि न्यायमूर्ती एम. एस. सोनक यांनी शुक्रवारी कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाला दिले.

> यापूर्वी दिलेल्या तोडकामाच्या आदेशाची कठोर अंमलबजावणी करण्याचे आणि कोणतीही सवलत पालिकेला, रहिवाशांना न देता बेकायदा राधाई इमारत १२ ऑगस्टपर्यंत तोडण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या कारवाईत टाळाटाळ केली तर पालिका आयुक्तांसह अधिकाऱ्यांवर न्यायालयाने कारवाईचा इशारा दिला आहे.
>
> –ॲड. सुहास देवकर, याचिकाकर्ता वकील.

या कारवाईसाठी ठाणे पोलीस आयुक्तांनी विशेष पोलीस बळ उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करावी, असे स्वतंत्र आदेश न्यायालयाने दिले. गेल्या चार वर्षांपासून नांदिवली पंचानंद येथील बेकायदा राधाई इमारतीचा विषय उच्च न्यायालयात दावा सुरू होता. जमीन मालक जयेश म्हात्रे यांच्या वडिलोपार्जित मालकी हक्काची जमीन श्री स्वस्तिक होम्सचे मयूर रवींद्र भगत यांनी हडप करून तेथे सात माळ्याची बेकायदा राधाई इमारत उभारली आहे. या जमिनीचा विकासकरारनामा सचिन विष्णू पाटील, संजय विष्णू पाटील, राधाईबाई विष्णू पाटील यांनी भगत यांच्याशी केला आहे. याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात जयेश म्हात्रे गेल्या आठवड्यात गुन्हा दाखल करून याप्रकरणात सुरेश मारूती पाटील यांचीही चौकशी करण्याची मागणी केली आहे.

पालिकेकडे चार वर्षांत मागणी करूनही या बेकायदा इमारतीवर कारवाई करण्यात आली नाही, म्हणून जमीन मालक जयेश म्हात्रे यांनी मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. राधाई बेकायदा इमारत तोडण्याची मागणी केली होती. न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकून दोन आठवड्यांपूर्वी राधाई इमारत १५ दिवसात म्हणजे १६ जुलैपर्यंत तोडण्याचे आदेश दिले होते.

कारवाईच्या दिवशी पालिकेच्या ई प्रभागाचे साहाय्यक आयुक्त चंद्रकांत जगताप, मानपाडा पोलीस घटनास्थळी तोडकाम पथक घेऊन गेले. भाजप पदाधिकारी आणि रहिवाशांनी कारवाईला कडाडून विरोध करून पालिकेची कारवाई हाणून पाडली. पालिकेने याप्रकरणी उच्च न्यायालयात गेल्या आठवड्यात भाजप कार्यकर्त्यांनी विरोध केल्याने कारवाई करता आली नाही. या इमारतीत रहिवासी आहेत. दोन महिन्याचा अवधी कारवाईसाठी देण्याची मागणी केली होती. न्यायालयाच्या आदेशाची पालिका, पोलिसांनी अंमलबजावणी केली नाही म्हणून शुक्रवारी जयेश म्हात्रे यांच्या वतीने ॲड. सुहास देवकर यांनी न्यायालयात बाजू मांडली. भाजप पदाधिकाऱ्यांनी केलेल्या विरोधाची छायाचित्रे न्यायालयात दाखल करण्यात आली. आदेश देऊनही राधाई बेकायदा इमारत न तोडल्याने न्यायालयाने संताप व्यक्त करत पालिका अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. या प्रकरणात आता तुम्हाला कोणतीही सवलत मिळणार नाही आणि कोणतेही कारण न देता येत्या १२ ऑगस्टपर्यंत ही बेकायदा इमारत तोडण्यात यावी, असे आदेश दिले. या कारवाईत आता टाळाटाळ केली तर कल्याण डोंबिवली पालिका आयुक्तांसह जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशारा न्यायालयाने दिला.

भरत चव्हाण, ओमकार चव्हाण यांच्याकडून

## विद्यार्थ्यांना १५ हजार वह्यांचे वाटप



ठाणे : भाजपाचे माजी नगरसेवक भरत चव्हाण व भाजयुमोचे प्रदेश सचिव ओमकार चव्हाण यांच्या तारामाऊली सामाजिक सेवा संस्थेच्यावतीने कोपरी परिसरातील सुमारे दोन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना १५ हजार वह्यांचे वाटप करण्यात आले. भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती. काल मुसळधार पावसातही शेकडो विद्यार्थी व पालकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून तारामाऊली सामाजिक सेवा संस्थेच्या शैक्षणिक सेवाकार्यात सहभाग घेतला.

तारामाऊली संस्थेकडून कोपरी परिसरातील विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी वह्या देण्याचा उपक्रम हा राबविला जातो. माजी नगरसेवक भरत चव्हाण व भाजपा युवा मोर्चाचे सचिव ओमकार भरत चव्हाण यांच्यावतीने कोपरी परिसरातील गरजू विद्यार्थ्यांपर्यंत गरजू विद्यार्थ्यांपर्यंत वह्यांची भेट देण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे ठाण्यातील शैक्षणिक वर्तुळात हा उपक्रम प्रसिद्ध आहे.

विद्यार्थ्यांच्या विकासासाठी आणि शिक्षणाच्या प्रगतीसाठी असे उपक्रम महत्त्वाचे असतात. या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवीन ज्ञानाची आणि उत्तम भविष्यासाठी प्रोत्साहन मिळत असते. भरत चव्हाण व ओमकार चव्हाण यांनी राबविलेला हा उपक्रम स्तुत्य आहे. तसेच मुलांच्या भविष्यासाठी मदतीचा आहे, अशा शब्दांत आमदार केळकर व आमदार डावखरे यांनी उपक्रमाचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी भावनाताई भरत चव्हाण, डॉ. सोनल चव्हाण, भाजपाचे कोपरी मंडल अध्यक्ष शिवाजी रासकर, प्रभाग अध्यक्ष मंदार पाटोळे, कोपरी महिला मंडल अध्यक्षा सुवर्णा अवसरे, युवा मोर्चाचे मंडल अध्यक्ष निलेश कुशवाह, श्रुतिका कोळी–मोरेकर, सुचित्रा भोईर, गणेश भोईर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

## नवी मुंबई पालिका क्षेत्रामधील पाणी कपात रद्द

नवी मुंबई : नवी मुंबई पालिकेच्या मोरबे धरणामधून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रास पाणीपुरवठा होत असून यावर्षी पावसाळी कालावधी सुरू होऊनही १५ जून २०२४ पर्यंत केवळ ७८.६० मिमी इतकाच अपुरा पाऊस झालेला होता. त्यावेळी मोरबे धरणामध्ये फक्त २६% इतकाच पाणी साठा शिल्लक होता. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये पाणी पुरवठा करताना संध्याकाळच्या पाणी पुरवठयात वाढीव कपात करण्यात आलेली होती.

सध्या जुलै महिन्यात चांगल्या प्रकारे पर्जन्यवृष्टी होत असून आज दि. २६ जुलै २०२४ पर्यंत मोरबे धरण क्षेत्रामध्ये एकूण २४०७ मिमी इतका पाऊस झालेला आहे. यामुळे मोरबे धरणामध्ये एकूण ७४% पाणी साठा उपलब्ध झालेला आहे. त्या अनुषंगाने दि. १५ जून २०२४ पासून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात केलेली पाणी कपात रद्द करण्यात येत आहे.

दि. २९ जुलै २०२४ पासून पाणी पुरवठा नियमितपणे सुरू राहील याची कृपया नोंद घ्यावी असे सूचित करण्यात येत आहे.

तरी नवी मुंबईकर नागरिकांनी पाणी कपातीच्या कालावधीमध्ये केलेल्या सहकार्याबद्दल महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी आभार व्यक्त केले आहेत.



भारतीय सेनेच्या २५ व्या कारगिल विजय दिवसानिमित्त ठाणे व पालघर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयात शहीद जवानांना अभिवादन करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये–धुळे यांनी शहीद जवानांच्या स्मृतीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक अंबादास वदक, सैनिकी मुलाच्या वसतिगृहाचे अधीक्षक चंद्रशेखर भोसले यांच्यासह ठाणे जिल्ह्यातील माजी सैनिक, कार्यालयातील कर्मचारी व नागरिकांनीही कारगिल युद्धातील शहिदांना आदरांजली अर्पण केली.

## ७५ हजार गोविंदांना मिळणार विमा कवच

### प्रत्येक गोविंदांना १० लाखापर्यंत विम्याचे संरक्षण मिळणार

भाईंदर : दहीहंडी उत्सव हे आपल्या संस्कृतीचे प्रतीक आहे. मुंबई, ठाणे तसेच राज्यभरात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो. थरावर थर रचणाऱ्या गोविंदांच्या सुरक्षिततेसाठी गोविंदा विमा कवच मिळावे अशी मागणी मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे यांना केली होती. त्याप्रमाणे राज्य शासनाकडून ७५ हजार गोविंदांना विमा कवच देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक गोविंदांना १० लाखापर्यंत विम्याचे संरक्षण मिळणार आहे. आमच्या मागणीची दखल घेत गोविंदांना विमा कवच दिल्याबद्दल मुख्यमंत्री महोदयांचे मनपूर्वक आभार. लाखोंच्या संख्येने गोविंदा दहीहंडी उत्सवात सहभागी होतात. थरावर थर रचताना अनेक दुखापती त्यांना होतात. आपल्या जीवाची बाजी लावत ते आनंदात दहीहंडी उत्सव साजरा करतात. त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने त्यांना विमा कवच मिळणे अत्यंत आवश्यक होते. राज्य शासनाने त्याची पूर्तता केली याचे समाधान आहे.



# प्रकल्पग्रस्त, झोपडीधारकांची आजतागायतची घरे मालकी हक्क देऊन नियमित करावीत

**■ शासनानेच झोपडपट्टी पुनर्विकास करावा ■ प्रकल्पग्रस्तांच्या हिताची त्यांना पाहिजे तशी योजना जाहीर करावी ■ लोकनेते आ. गणेश नाईक यांची मागणी**

नवी मुंबई : नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची आणि झोपडीधारकांची आजतागायतची सर्व घरे नियमित करून त्याखालील जमिनीचा या घटकांना मालकी हक्क द्यावा, अशी मागणी लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी केली आहे. नवी मुंबईतील विविध विषयांवर आज लोकनेते आमदार नाईक यांची महापालिका आयुक्त कैलाश शिंदे यांच्यासोबत बैठक पार पडली. या बैठकी प्रसंगी माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, माजी महापौर जयवंत सुतार, माजी सभागृहनेते रवींद्र इथापे, स्थायी समितीचे माजी सभापती अनंत सुतार, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्यासह अन्य लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी उपस्थित होते. गरजेपोटीची बांधकामे आणि झोपडपट्टी पुनर्वसन या विषयांवर प्रसिद्धी माध्यमांनी प्रतिक्रिया विचारली असता लोकनेते आमदार नाईक यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.



सध्या जी योजना लादली जाते आहे आणि सर्वेक्षणासाठी मागणी केली जाते आहे. त्या योजनेमध्ये केवळ २००० पर्यंतच्या झोपडी धारकांना घर आणि २०११ पर्यंतच्या झोपडीधारकांना पैसे भरले तरच घर मिळणार आहे. २०११ नंतरच्या झोपडीधारकांचे काय होणार? हे प्रश्नचिन्ह आहे.

लोकनेते आमदार नाईक यांनी सांगितले, अन्न वस्त्र निवारा ही सर्वांची मूलभूत गरज आहे. चांगलं जीवनमान जगण्यासाठी चांगला निवारा पाहिजे. आजतागायतची घरे मग ती प्रकल्पग्रस्तांची गरजेपुरती बांधलेली सर्व प्रकारची बांधकामे असोत, झोपडीधारकांची घरे असोत, साडेबारा टक्के, एलआयजी, एमआयजी घरे असोत या घरांची आणि त्या खालच्या जमिनीची मालकी त्या त्या घटकांना देऊन ही घरे सर्वप्रथम नियमित केली पाहिजेत. प्रकल्पग्रस्तांच्या हिताची योजना त्यांना पाहिजे तशी सरकारने जाहीर केली पाहिजे. झोपडीधारकांना जास्तीत जास्त आकाराची चांगली घरे मिळायला हवीत. खाजगी बांधकाम व्यवसायिकाच्या माध्यमातून झोपडपट्टी पुनर्वसन करण्याऐवजी शासनाने तज्ञ व्यक्तींची समिती नेमून झोपडीधारकांना पाहिजे तशी स्वतःच झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवावी. झोपडपट्ट्यांचा शाश्वत विकास करून गुणवत्तापूर्ण घर उपलब्ध करून द्यावे. या प्रश्नावर शासनाकडे पाठपुरावा सुरू असून मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा झाली आहे. त्यांनी सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिल्याची माहिती देखील लोकनेते आमदार नाईक यांनी दिली.

### सर्वांनाच घरे मिळाली पाहिजेत ....

नवी मुंबईतील झोपडीधारकांनी आणि या लोकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकप्रतिनिधींनी आजपर्यंतच्या सर्व झोपडीधारकांना योजनेमध्ये घरे मिळाली पाहिजेत. अशा प्रतिक्रिया दिल्या आहेत. २०११ नंतरच्या झोपडी धारकांना बेघर करणार आहात का? असा सवालही झोपडीधारकांनी विचारला आहे. त्याचबरोबर प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटीची घरे आणि उदरनिर्वाहासाठीची सर्व प्रकारची बांधकामे मालकी हक्क देऊन नियमित करण्याची मागणी देखील करण्यात आली आहे.

> प्रकल्पग्रस्तांची गरजे पोटीची घरे नियमित करण्याची शासनाने अद्याप अंमलबजावणी केलेली नाही. लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी वेळोवेळी हा प्रश्न शासन दरबारी लावून धरलेला आहे. आजतागायतची प्रकल्पग्रस्तांची घरे आणि उदरनिर्वाहासाठीची बांधकामे मालकी हक्क देऊन नियमित करावीत.
>
> – **जयवंत सुतार,** माजी महापौर

> कुटुंब विस्तार झाल्याने झोपडीधारकांनी घरांचा विस्तार केला. खालच्या आणि त्यावरच्या घरांना योजनेचा लाभ मिळाला पाहिजे. पत्र्याची झोपडपट्टी जाऊन काँक्रीटची झोपडपट्टी नको. चांगल्या आकाराची गुणवत्तापूर्ण पूर्ण घरे मिळाली पाहिजेत. खाजगी बिल्डरांच्या माध्यमातून योजनेचे व्यवसायीकरण होईल. शासनानेच पुनर्वसन करावं. झोपडीधारकांचे त्यावर नियंत्रण असेल. या सर्व बाबींची स्पष्टता असेल तरच योजनेला समर्थन देऊ.
>
> – अमित मेढकर, माजी नगरसेवक

■ प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटीची घरे असोत किंवा झोपडी धारकांची घरे असोत अगोदर या घरांची आणि जमिनीची मालकी या घटकांना द्यावी. काही घटकांना स्वतःचा विकास करायचा आहे म्हणून एसआरए योजना लादली जाते आहे. या योजनेत खुराड्यासारखी घरे मिळतील. राहण्यायोग्य, चांगल्या आकाराची आणि सुविधायुक्त योजना आणली तरच आम्ही मान्य करू.

– **दशरथ भगत,** माजी विरोधी पक्ष नेते

■ काही घटक या योजनेमध्ये स्वतःचा स्वार्थ बघतायेत. झोपडीधारकांना विश्वासात घेतलेले नाही. २००० च्या सर्वेक्षणामध्ये ६० टक्के लोक अपात्र झाले आहेत. त्यांना अगोदर पात्र करा. २०२४ पर्यंतच्या लोकांना योजनेमध्ये सामावून घेतले पाहिजे.

– **अन्वर शेख,** माजी परिवहन समिती सभापती

■ २०२४ पर्यंत आजतागायत जे लोक झोपड्यांमध्ये राहत आहेत. त्या सर्वांना नवीन योजनेमध्ये पात्र केले पाहिजे. बिल्डरांच्या माध्यमातून नको शासनाने जास्तीत जास्त आकाराची चांगली घरे बांधून द्यावी.

– **राजेंद्र इंगळे,** माजी परिवहन समिती सदस्य

■ २५ ते ३० वर्षांपासून राहणारे लोक अपात्र ठरत आहेत. शासनाला या गोरगरिबांना न्याय द्यायचा असेल तर शासनाने स्वतः झोपडपट्टी पुनर्विकास करावा आणि २०२४ पर्यंतच्या झोपडीधारकांना सामावून घेता येईल अशी शास्त्रशुद्ध योजना जाहीर करावी.

– **चंद्रकांत पाटील,** माजी नगरसेवक

■ दडपशाही करून योजना राबविण्याचा प्रयत्न होतो आहे. २०११ पर्यंत नाही तर २०२४ पर्यंतच्या झोपडीधारकांना चांगली हक्काची घरे मिळतील अशी योजना झोपडीधारकांना पाहिजे.

– **यल्लू शिंगे,** समाजसेवक

# पालिकेच्या दक्षतेने अतिवृष्टीतही नवी मुंबईतील परिस्थिती नियंत्रणात

नवी मुंबई :नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात २४ जुलै रात्रीपासून जोरदार पर्जन्यवृष्टी होत असून २४ जुलै रोजी सकाळी ८.३० ते २६ जुलै सकाळी ८.३० पर्यंत ४८ तासात सरासरी १६५.४८ मिमी. पावसाची नोंद झालेली आहे. त्यामध्ये २५ जुलै सकाळी ८.३० ते २६ जुलै सकाळी ८.३० या एकाच दिवसात सरासरी ९८.०५ मिमी. इतक्या मोठया प्रमाणात पर्जन्यवृष्टी झालेली आहे. नवी मुंबईत अतिवृष्टी होऊनही महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार महानगरपालिकेची मदत यंत्रणा सर्व क्षेत्रात दक्षतेने तैनात असल्याने शेजारच्या शहरांच्या तुलनेत नवी मुंबईतील परिस्थिती नियंत्रणात होती व महानगरपालिकेच्या स्वच्छता, आरोग्यासह सर्व सेवाही कार्यान्वित होत्या.

पावसाची संततधार स्थिती पाहून नमुंमपा आयुक्त रात्रीपासूनच सर्व संबंधितांच्या संपर्कात होते. आपत्ती नियंत्रण कक्षातून शहरातील परिस्थितीचा आढावा घेतला जात होता. आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्तांसह विभागप्रमुख व सर्व विभाग अधिकारी तथा सहा.आयुक्त हे अधिनस्त कर्मचाऱ्यांसह मदतकार्यासाठी सज्ज होते. स्वच्छता कर्मचारी पावसात स्वच्छतेची कामे करीत होते. घंटागाड्यांमार्फत कचराही वेळेत उचलण्यात आला. त्यामुळे शहरातील स्वच्छता नेहमीसारखी राहिली. आरोग्य यंत्रणाही नागरी आरोग्य केंद्रापासून रूग्णालयापर्यंत सर्वच स्तरांवर दक्षतेने कार्यान्वित होती. ज्या ठिकाणी वाहत्या पाण्याला अडथळा निर्माण झाल्याची माहिती मिळाली त्या ठिकाणचे अडथळे दूर करून पावसाळी पाण्याच्या प्रवाहाला वाट मोकळी करून देण्यात आली.

महानगरपालिकेच्या मध्यवर्ती नियंत्रण कक्षास तसेच विभागीय नियंत्रण कक्षास प्राप्त झालेल्या माहितीनुसार ज्या ठिकाणी झाडे अथवा झाडांच्या फांद्या पडल्या आहेत अशा ७ ठिकाणी अग्निशमन दल तसेच आपत्कालीन मदत पथकाने जाऊन रहदारीला होत असलेला अडथळा दूर केला. दोन ठिकाणी आगीच्या किरकोळ घटनांचीही तात्काळ दखल घेऊन अग्निविमोचन कार्यवाही करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त आदेशानुसार पावसाची स्थिती बघता नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली. जे विद्यार्थी सकाळच्या सत्रात शाळेत आले होते ते सुरक्षितपणे घरी पोहोचतील याची दक्षता घेण्याचे मुख्याध्यापक व शिक्षकांना निर्देशित करण्यात आले व त्यानुसार कार्यवाही करण्यात आली. दुपारच्या सत्रातील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली. त्याचप्रमाणे ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने रात्री जाहीर केल्याप्रमाणे २६ जुलै रोजीही शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली.

दि. २५ जुलै २०२४ रोजी सकाळी ८.३० पासून दि. २६ जुलै २०२४ रोजी सकाळी ८.३० पर्यंत नमुंमपा क्षेत्रात सरासरी ९८.०५ मि.मी. पावसाची नोंद झाली. त्यामध्ये बेलापूर विभागात सर्वाधिक १४६.६० मि.मी. तसेच नेरुळ विभागात ९८.९० मि.मी., वाशी विभागात ६७.७० मि.मी., कोपरखैरणे विभागात १३३.३० मि.मी., ऐरोली विभागात ६३.८० मि.मी., दिघा विभागात ७८.०० मि.मी इतक्या मोठया प्रमाणात पर्जन्यवृष्टी नोंदीत झाली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सकाळीच विविध माध्यमांतून अतिवृष्टीच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी महत्वाच्या कामाशिवाय घराबाहेर पडू नये असे आवाहन आयुक्तांच्या वतीने करण्यात आले व महानगरपालिकेच्या सर्व यंत्रणेला दक्ष राहण्याचे आदेशित करण्यात आले. त्यानुसार सर्व यंत्रणा महापालिका क्षेत्रामध्ये विविध विभागात मदतकार्यासाठी कार्यरत होती. यामुळे जोरदार पाऊस पडूनही नवी मुंबई शहरातील परिस्थिती नियंत्रणात राहिली. कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

२१ जुलै रोजीच्या मुसळधार पावसानंतर महानगरपालिकेमार्फत पाणी साचलेल्या विविध स्थळांची पाहणी करुन पाणी साचण्याची कारणे जाणून घेण्याचा बारकाईने प्रयत्न करण्यात आला. याकरिता त्या स्थळांच्या आसपासच्या नाल्यांची पाहणी करण्यात आली तसेच तेथील स्थानिक नागरिकांशीही संवाद साधण्यात आला.














महाराष्ट्रातील घडामोडींचा आढावा घेणारे आघाडीचे वृत्तपत्र...
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
दैनिक
महाराष्ट्र सम्राट
वृत्तपत्रास वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा !
१३ वा वर्धापन दिन
शुभेच्छुक
डॉ.राजेश मढवी
(ठाणे जिल्हा उपाध्यक्ष : भा.ज.पा.)
(संस्थापक/अध्यक्ष : ठाणे गौरव सेवा प्रतिष्ठान)
संस्थापक: डॉ राजेश मढवी फाऊंडेशन
सौ.प्रतिभा रा. मढवी
मा.नगरसेविका
ठा.म.पा.




१३
वा
वर्धापन दिन
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
दैनिक
महाराष्ट्र सम्राट
वृत्तपत्रास "वर्धापन दिनाच्या"
हार्दिक शुभेच्छा !
आपल्या वृत्तपत्र परिवारातील
सर्व सदस्यांचे मनःपूर्वक अभिनंदन
व पुढील वाटचालीसाठी
यशोदायी शुभेच्छा !
शुभेच्छुक
शिवसेना
मुकेश ठोमरे
शिवसेना विभागप्रमुख




१२ वर्षे विश्वासाची
आणि सातत्याची...
१३ वा वर्धापन
दिन सोहळा
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
दैनिक
महाराष्ट्र सम्राट
परिवारास वर्धापन दिनाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा !
पुढील वाटचालीसाठी
यशोदायी शुभेच्छा !
* शुभेच्छुक *
शाहआलम शाहिद आजमी
मा.नगरसेवक-ठा.म.पा.
प्र.क्र.33 (ड)




सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
दैनिक
महाराष्ट्र सम्राट
वृत्तपत्रास १३ व्या
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
शिवसेना
श्री.रमेश रामचंद्र वैती
शिवसेना उपजिल्हाप्रमुख : ठाणे
मा.महापौर : ठा.म.पा.
श्री.जयेश रमेश वैती
मा.नगरसेवक : ठा.म.पा.




सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
दैनिक
महाराष्ट्र सम्राट
शिवसेना
परिवारास १३ व्या
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
शिवसेना
श्री. राजेंद्र फाटक
शहरप्रमुख - ओवळा माजिवाडा,विधानसभा क्षेत्र
सौ. राधिका राजेंद्र फाटक
मा. अध्यक्षा - वर्तक नगर प्रभाग समिती
मा. नगरसेविका ठा.म.पा.

# पोलिसांच्या ३१६ घरांची योजना लवकरच कार्यान्वित होणार

## आमदार संजय केळकर यांच्याहस्ते पोलीस वसाहतीतील दुरुस्ती आणि नूतनीकरणाचा शुभारंभ

ठाणे (गणेश भोईटे): ठाणे शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेचे कर्तव्य रात्रंदिवस बजावणाऱ्या पोलिसांच्या सुमारे ६०० घरांच्या वसाहतीतील दुरुस्ती आणि नूतनीकरणाच्या कामाचा शुभारंभ आमदार संजय केळकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नवीन ३१६ घरांच्या पाच इमारतींचे काम येत्या काळात लवकरच सुरू होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.



जरीमरी येथील २४० घरे व १ ते ६ नवीन पोलिस वसाहतीतील ३६० घरे अशा एकूण ६०० घरांच्या सुरावस्थेबाबत आमदार संजय केळकर यांनी अधिवेशनात आवाज उठवला होता. तसेच शासन दरबारी पाठपुरावा करून त्यास मंजुरी घेतली. या वसाहतींच्या दुरुस्तीचा कार्यादेश नुकताच देण्यात आला. मुसळधार पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून आमदार संजय केळकर यांनी तातडीने कोणताही गाजावाजा न करता श्रीफळ वाढवून या कामाचा शुभारंभ केला.

यापूर्वीही आमदारांच्या प्रयत्नाने रवी, भास्कर, सूर्य, अरुण, आदित्य या वसाहतीतील २६० सदनिकांचे बाथरूम व शौचालयाचे लिकेज, इतर दुरुस्ती आणि नूतनीकरणाचे काम गृह विभागाच्या निधीतून करण्यात आले. चालक पोलीस वसाहत ए, बी, सी येथील ११२ सदनिकांच्या नूतनीकरणाचे कामही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निधीतून करण्यात आले.

ठाणे शहरातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची सुमारे १०५० घरे आहेत. तेथील १ ते १२ चाळ जवळपास शंभर वर्षे जुनी आहे. त्या ठिकाणी ३१६ घरांची पाच इमारतींची मंजुरी आमदार संजय केळकर यांनी शासन दरबारी घेतली आहे. लवकरच निधी उपलब्ध करून तेही काम चालू करणार असल्याचे आमदार संजय केळकर यांनी सांगितले. ठाणे पोलीस व निवृत्त पोलीस कर्मचारी यांच्या हक्काच्या घरांसाठी शासन दरबारी पाठपुरावा करत आहेत.

या विकासकामांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी सहकार्य केल्याने केळकर यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

गौरी गणपती उत्सवानिमित्त १ कोटी ७० लाखापेक्षा जास्त

# शिधापत्रिकाधारकांना मिळणार आनंदाचा शिधा

मुंबई : यंदाच्या गौरी गणपती उत्सवानिमित्त राज्यातील १ कोटी ७० लाख ८२ हजार ८६ शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा वितरीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

प्रती संच १०० रुपये या सवलतीच्या दराने मिळणाऱ्या या आनंदाचा शिधा संचामध्ये प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि एक लिटर सोयाबीन तेल या शिधा जिन्नसांचा समावेश असणार आहे. आनंदाचा शिधा संच्याचे वाटप दि १५ ऑगस्ट २०२४ ते १५ सप्टेंबर २०२४ या कालावधीत करण्यात येणार आहे.

राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिका धारक तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे, नागपूर विभागातील वर्धा या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेवरील (एपीएल) केशरी शिधापत्रिका धारक शेतकरी यांना या आनंदाचा शिधा मिळणार आहे.

प्रती शिधापत्रिका एक शिधा जिन्नस संचाची खरेदी करण्यासाठी ५६२.५१ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. या संचाचे वाटप ई-पॉस प्रणालीद्वारे करण्यात येणार आहे.

पुण्यातील घरांमध्ये शिरलेला गाळ, चिखल दूर करण्यासाठी

# युद्धपातळीवर मोहीम हाती घ्यावी : मुख्यमंत्री

**मुंबई : पुणे शहर आणि परिसरात काल झालेल्या अतिवृष्टीमुळे सिंहगड रोड, संचयनी पुलाजवळील पाटील इस्टेट, एकता नगर, फुलपची वाडी आदी भागातील घरांमध्ये पाणी शिरल्याने चिखल आणि घाणीचे साम्राज्य पसरले. या घरांमधील चिखल, गाळ आणि कचऱ्याची महानगर पालिका तसेच साफसफाई करणाऱ्या खासगी कंपन्याच्या मदतीने युद्धपातळीवर स्वच्छता मोहीम राबवावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. पुरामुळे घरांचे, शेतीचे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केल्या आहेत.**

पुण्यातील सिंहगड रोड, संचयनी पुलाजवळील पाटील इस्टेट, एकता नगर, फुलपची वाडी आदी भागातील घरामध्ये चिखल शिरला आहे. त्यामुळे या भागातील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असून त्याची त्वरित दखल मुख्यमंत्री शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला डीप क्लीन मोहिम राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

घरांमध्ये शिरलेल्या पुराच्या पाण्यामुळे झालेला चिखल साफ करण्यासाठी सुमित इंटरप्राईजेस आणि बीव्हीजी या खासगी स्वच्छता कंपन्यांची मदत घेण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाची दखल घेऊन सुमित कंपनी ५०० स्वच्छता कर्मचारी आणि बीव्हीजी कंपनी १०० सफाई कर्मचारी उपलब्ध करून देणार असून त्यांच्या माध्यमातून घरांमधील चिखल काढून साफसफाई करण्यात यावी, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.पुराचे पाणी, चिखल यामुळे परिसरात रोगराई पसरू नये यासाठी महानगरपालिका प्रशासनाने औषधांची फवारणी करावी असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी महानगरपालिका प्रशासनाला दिले आहेत.

# मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाचा सुधारित कार्यक्रम जाहीर

मुंबई : महाराष्ट्र विधानसभेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने तयारी सुरू केली आहे. त्यासाठी राज्यातील मतदार याद्या अद्ययावतीकरणाचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. भारत निवडणूक आयोगाने १ जुलै २०२४ रोजीच्या अर्हता दिनांकाच्या आधारे मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाचे (दुसरा) वेळापत्रक निश्चित केले आहे. त्यात आता सुधारणा करण्यात आली आहे, अशी माहिती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये दिली आहे. १८ व्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका यशस्विरित्या पार पडल्यानंतर, भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. त्यासाठी राज्यांमधील मतदार याद्या अद्ययावत करण्याचा कार्यक्रम घोषीत केलेला आहे. भारत निवडणूक आयोगाने त्यांचे दि. २० जून, २०२४ रोजीचे पत्रान्वये दि.१.७.२०२४ या अर्हता दिनांकाच्या आधारावर राज्यात मतदारयाद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम (दुसरा) बाबतचे वेळापत्रक निश्चित केले होते. मात्र, भारत निवडणूक आयोगाने आज दि. २४ जुलै २०२४ रोजीच्या पत्रान्वये या कार्यक्रमाच्या वेळापत्रकात बदल केला असून, सुधारीत कार्यक्रम जाहिर केला आहे, तो असा : मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याद्वारा प्रत्यक्ष घरोघरी भेट देऊन पडताळणी, मतदान केंद्राचे सुसुत्रीकरण व प्रमाणीकरण, मतदार यादी/ मतदार ओळखपत्रातील त्रुटी दूर करणे इ., आयोगाच्या मानकानुसार छायाचित्र प्राप्त करून मतदार यादीत सुधारणा करणे तसेच, अस्पष्ट/ अंधूक छायाचित्र बदलून त्याऐवजी संबंधित मतदाराकडून योग्य दर्जाचे छायाचित्र प्राप्त करून मतदार यादीत सुधारणा करणे, विभाग / भागांची आवश्यकतेनुसार नव्याने मांडणी करून मतदान केंद्राच्या सीमांची पुनर्रचना तयार करून मतदान केंद्राच्या यादीस मान्यता घेणे आणि तुलनात्मक फरक शोधून फरक दूर करण्यासाठी कालबध्द योजना आखणे, कंट्रोल टेबल अद्ययावत करणे, नमुना १-८ तयार करणे, ०१ जुलै, २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत पुरवणी व एकत्रीत प्रारूप यादी तयार करणे - २५ जून ते १ ऑगस्ट २०२४.

# माजी सैनिकांच्या कल्याणासाठी राज्य शासन कटिबद्ध : मुख्यमंत्री शिंदे

मुंबई : कारगिल युद्धातील वीरांना अभिवादन करताना आपण त्यांचे शौर्य कायम आठवणीत ठेऊन कोणत्या ना कोणत्या स्वरूपात देशाची सेवा केली पाहिजे असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या युद्धात शहीद झालेल्या महाराष्ट्रातल्या सहा जवानांचे देखील स्मरण केले. आज २५ व्या कारगिल विजय दिवसानिमित्त त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. माजी सैनिक आणि त्यांच्या परिवारासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री यांनी कारगिल युद्धातील शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सैनिक कधीही माजी होत नसतो. याची जाणीव आम्हाला आहे. म्हणूनच त्याच्या कल्याणासाठी आम्ही महत्वाचे निर्णय घेतले आहेत. शासनाने माजी सैनिकांसाठी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतलाय. खारघर येथे माजी सैनिकांचे विश्रामगृहही उभे करणार आहोत. मेस्कोचे विविध उपक्रम, माजी सैनिकांना रोजगार संधी, त्यांच्या वेतनातील तफावत दूर करणार आहोत. मुंबईमध्ये युद्ध संग्रहालय करण्याचा निर्णय घेतलाय. सातारा जिल्ह्यातल्या अपशिंगे मिलिटरी गावातील विकास कामांना प्राधान्य देण्याचा शासनाचा मानस आहे. माजी सैनिकांना टोलमधून सवलत आणि असे अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

आजही कुठलीही आपत्ती आली की आपल्याला सैन्य दलातील आपल्या जाँबाज जवानांची आठवण येते असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, सीमेचं रक्षण असो की आपल्या परिसरातील गंभीर आपत्ती आपल्या अंतर्गत बचाव पथकांसोबत या जवानांची लष्कर, हवाई आणि नौदलाची साथ मिळाली की आपल्याला आणखी धीर येतो. इतका विश्वास सैन्य दलातील जवानांवर, त्यांच्या हिमंतीवर ठेवतो.

वीर जवानांच्या कुटुंबांची काळजी घेण्यासाठी येत्या काळात आणखी काही महत्वाचे निर्णयही आपण घेणार आहोत असेही ते म्हणाले. आपला महाराष्ट्र शिवछत्रपतींचा महाराष्ट्र आहे. शिवछत्रपतींना देशाला स्वाभिमान आणि धर्म-देव-देवळांच्या रक्षणाचा धडा दिला. हाच वारसा घेऊन आमचे शासन काम करीत आहे. देशाच्या सीमेचे रक्षण करणारे जवान आणि त्यांच्या कल्याणासाठी जे-जे काही करता येईल त्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत हे आमचं कर्तव्य आहे, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.




'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१